२० जुलै २०२१
आषाढी एकादशी

॥श्री॥

# ॥ परा पूजा ॥

श्रीमद् शंकराचार्य — सिद्धांत, विचारधन, स्तोत्रवैभव ग्रंथवैभव - सर्वांपर्यंत पोहोचायला हवे.
ही आर्यांची श्रीमंती आहे. आर्य म्हणजे सुसंस्कृत। स्वतःला उन्नत करण्याची प्रबळ इच्छा असणारी कोणत्याही जाति-धर्म-पंथ-संप्रदायाची व्यक्ती। स्त्री पुरुष, सवर्ण-शूद्र, श्रीमंत-गरीब कोणीही।

आपलेच विचार अधिक प्रगल्भ, अधिक व्यापक, सखोल होण्यासाठी ही स्तोत्रे लाभदायक ठरतात. कारण यात केवळ देवता स्तवन नाही तर त्यामध्ये अवर्णनीय सौंदर्य आहे. वाणीचे माधुर्य आहे आणि विचारांचे गांभीर्य आहे. शब्दांची चमत्कृति, काव्यबंधाची आकृति आहे आणि सहजतेची प्रकृति आहे. ही काव्ये वाचायला लागलो की ती गुणगुणावीशी वाटतात. आणि कानाला मधुर वाटतात. गेयता, परिपूर्णता, मृदुता।

स्तोत्रांचे तीन प्रकार

१. देव देवता २. निर्गुण सद्वस्तु ३. उपदेश/साधना

सगुणोपासना — भवानी, पांडुरंग, कृष्ण, जगन्नाथ, शिव देवी अन्नपूर्णा, श्रीराम, गुरुदेवदत्त, कालभैरव, गोविंद, अच्युत

२. निर्गुणोपासना - धन्याष्टकम्, (मायापंचक, वैराग्यपंचक) अनात्मश्रीविगर्हणम्, स्वरूपानुसन्धान, जीवन्मुक्तानंदलहरी निर्वाणमञ्जरी, हस्तामलक, विज्ञाननौका, कैवल्याष्टक

३. उपदेश/साधना - वैराग्यपंचक, चर्पटपंजरिका

काही स्तोत्रांमध्ये सगुण आणि निर्गुण बेमालूमपणे मिसळले आहेत. सगुणाचे वर्णन करता करता आचार्य अचानकच निर्गुण निराकाराकडे घेऊन जातात. आणि हेच तर अध्यात्माचे मर्म आहे. सगुणामध्ये चित्त चटकन स्थिर होते आणि अशा स्थिर, एकाग्र मनाने निर्गुणाचे चिंतन करणे तितकेसे कठीण जात नाही.

सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे

भौतिकाकडून पारलौकिकाकडे — —

MARCH '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

© www.madhaveeraghuveer.com

राजा, साम्राज्य, सुंदर भार्या, गुणी संतति, सौंदर्य या सर्व बाह्य गोष्टी आंतरिक समाधान देऊ शकत नाहीत. मग त्याच्या पलीकडे काय आहे? सुख, शांति, समाधान कशात आहे?

शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं
यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥

अंतःकरणात सात्विक समाधानाचा आविर्भाव होण्यासाठी मानवाला अंतर्मुख होऊन अध्यात्मक्षेत्रात पदार्पण करायला हवे. भ. गौतम बुद्धांना याच सत्याचा साक्षात्कार झाला. आणि म्हणूनच त्या शांतिच्या शोधासाठी त्यांनी आपले वैभवशाली साम्राज्याचा त्याग केला. लावण्यवती तरुण पत्नी त्यांना अडवू शकली नाही. कुठल्या एक, निरागस, अबोध अर्भकाचा मोह त्यांना रोखू शकला नाही. या सर्व मायामोहातून ते निग्रहाने, धैर्याने बाहेर पडले आणि अंतर्मुख होऊन त्यांनी अध्यात्माच्या प्रांतात पाऊल ठेवले.

आत्मस्वरूपाचा यथार्थ साक्षात्कार केवळ तार्किक बुद्धिने होत नसतो. नैषा तर्केण मतिरापनेया। सद्गुरुमुखातून श्रवण घडले तर सुलभ रीतीने जाणता येते. किंवा त्या परब्रह्माने ज्या साधकाला निवडले असते. त्याची प्रगति उत्तम गतीने होते.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः
न मेधया न बहुधा श्रुतेन।
यमेवैष वृणुते तेन लभ्यः
तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम्।

आणि एकदा त्या शुद्ध आत्मस्वरूपाचा दिव्य साक्षात्कार झाला की सर्व दुःखे संपून जातात हा श्रुतिविहित सिद्धांत आहे. एकमेवाद्वितीय निरतिशय, आनंदस्वरूप अशा पूर्ण परब्रह्मात बुद्धि विलीन होणे यातच विचारांची पूर्णता आहे म्हणून पूर्ण परब्रह्माचा नित्य विचार

MAY '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

MAY JUNE

© www.madhavee...raghuveer.com

मंजिरी काळे

म्हायला पाहिजे. ब्रह्माचा विचार करता करता बुद्धीही ब्रह्मस्वरूपच होते. विचार करणारा देखील ब्रह्मरूपच होऊन जातो. त्याला एकत्वाचा अनुभव येतो. द्वैताचा संपूर्ण निरास होतो. शोक, मोह, दुःख, दैन्य पार मावळून जातात. पूर्ण समाधानाचा लाभ होतो.

तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥

आत्मस्वरूपाच्या यथार्थ दर्शनातच निरतिशय आनंदाची अनुभूति मिळते. त्यातच मानवी जीवनाचे साफल्य आहे. त्यासाठीच प्रस्थानत्रयीला महत्त्व आहे. प्रस्थानत्रयी म्हणजे आत्मस्वरूपाच्या उपदेशाचे साधन।

ईश्वराची आराधना करण्याचा एक मार्ग म्हणजे त्याची स्तुतिस्तोत्रे भक्तिभावाने गात रहाणे. त्या स्तुतिस्तोत्रांचा अर्थ अंतःकरणात पाझरायला लागतो. हृदयात प्रकाशायला लागतो. ती ईश्वर साक्षात्काराची पुसटशी चाहूल असते. त्या दृष्टीने स्तोत्रवाङ्मय हे मानवी जीवनात अतिशय उपयुक्त आहे. अशा अनेक स्तोत्रांमधून भक्ति, वैराग्य, उपदेश व अध्यात्म अशा चारही गोष्टी कमी अधिक प्रमाणात आढळतात. विषयांचे दोष, त्यांची अपूर्णता ध्यानात येते व त्यापासून परावृत्त होता येते. आणि क्रमशः मलिन अंतःकरण शुद्ध होत जाते आणि शुद्ध अंतःकरणात उपदेश रुजतो. अर्थात तो उपदेश अधिकारी व्यक्तीने केलेला असावा आणि त्याला अंतरीची तळमळ असावी.

आचार्यांच्या स्तोत्रातील देव देवता जरी भिन्न असल्या तरी सर्व स्तोत्रांमध्ये एक समान दुवा आहे. समान सूत्र आहे. सर्व स्तोत्रांमध्ये एकमेव, अद्वितीय सच्चिदानंदघन स्वरूप परमात्म तत्त्व ओतप्रोत भरलेले दिसते. कित्येकदा वेदांतज्ञान हे रुक्ष व कठीण असते. त्यात माधुर्य अभावानेच आढळते. परंतु आचार्यांची स्तोत्रे मात्र याला अपवाद आहेत. ती चवीला मधुरही आहेत. शिवाय

MARCH '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

© www.madhaveeraghuveer.com

तुष्टि आणि पुष्टि देणारी आहेत. वेदांतासारखा जड विषय त्यात असूनही ती म्हणताना अतीव आनंद मिळतो. शिवाय त्यातून बुद्धिला आत्मसमाधानाचे दिव्य तेज व सामर्थ्य प्राप्त होते. कारण त्यात आशयगर्भता तर आहेच पण मंत्रसामर्थ्यही आहे.

वाचे बरवे कवित्व । कवित्वी ते रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥

या स्तोत्रांच्या वारंवार पठणाने जीभेला धार प्राप्त होते आणि उच्चारांचा परिणाम आचारावर, विचारांवर निश्चितच होतो. Man is what he thinks

स्तोत्रपठणामुळे अंतःकरणात ईश्वरप्रेम, कृतज्ञता अशा उदात्त भावनांचा उदय होतो. साधकाची तत्त्वज्ञानाची भूमिका सुदृढ होते, बुद्धितील गोंधळ दूर होतो. भक्ति-भावाचा विकास होतो. त्यातील गेयतेमुळे पठणाबरोबर चिंतन घडते व त्यातील विचार मनावर ठसत जातात. त्याचबरोबर त्यातील निर्गुण लक्षणांच्या चिंतनाने त्याचे शुद्ध स्वरूपाचे बुद्धिला आकलन होऊ लागते.
आत्मानुभव आणि आत्मानंद एकच आहेत.

आचार्यांची तात्त्विक दृष्टी या स्तोत्रांमधून प्रतीत होत असली तरी स्तोत्र म्हणजे काही शास्त्रीय ग्रंथ नाही. ती तर परमार्थातील भावगीते आहेत. उत्स्फूर्त आहेत त्यात भक्ति, प्रेम, अनुताप, उत्कंठा, निराशा, प्रसन्नता, मार्दव, वात्सल्य अशा अनेक भावनांचे दर्शन घडते.

भक्ताची देवाशी एकरूप होण्याची वाटचाल अद्वैतपर्यंत चालूच असते. तरीदेखील त्यात किंचित अंतर असते. चतुर्दशीचा व पौर्णिमेचा चंद्र

वेदांताचे थोडे तरी ज्ञान असल्याखेरीज आचार्यांची स्तोत्रे पूर्णपणे समजत नाहीत. तत्त्वविचार
काव्यसौंदर्य- यमक, अनुप्रास, शब्दालंकार
दृष्टांत, रूपक, अर्थान्तरन्यास, स्वभावोक्ति
विरोधाभास - -

©www.madhaveeragiulveer.com

JUNE '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| M | T | W | T | F | S | S |

अगर न होते शंकर तो सभी रहते बौद्ध बनकर।

आज आपण हिंदु म्हणून अभिमानाने रहात आहोत त्यामागे आचार्यांची दूरदृष्टी व तपश्चर्या आहे. आचार्यांनी वेदविरोधी अशा बौद्ध व जैन, शैव शाक्त कापालिक-उग्रभैरव, नीलकंठ, भट्टभास्कर या व अशा तंत्रविद्येचा पुरस्कार करणाऱ्या मतांचे जोरदार खंडन करून समन्वयवादाची मोठ्या चातुर्याने मांडणी केली. अद्वैतवादाचा पुरस्कार करून वेदांचे प्रामाण्य व ईश्वराचे अस्तित्व सिद्ध केले. वैदिक धर्माची विस्कळित झालेली घडी नीटनेटकी केली. स्वतःच्या ~~वैराग्यातून~~ आचरणातून ज्वलंत वैराग्य, अनन्य भक्ति व श्रद्धा आणि ज्ञानमार्गाचा पुरस्कार केला. व देशाला महान सांस्कृतिक संकटातून सोडवले. एवढे थोर कार्य इतक्या अल्पवयात करून सुद्धा ते सदैव विनयशीलच होते.

त्यांचे वाक्पटुत्व, त्यांची स्मरणशक्ती, त्यांची प्रत्युत्पन्नमति यांची प्रशंसा करणाऱ्या शिष्यांना ते म्हणतात. "समुद्राच्या पाण्यामध्ये दंड (काठी) बुडवला असताना त्याला जेवढे पाणी लागलेले असते. तेवढेच माझे ज्ञान आहे." ज्ञानाच्या अथांग महासागरातील मी एक कण आहे."

अभिनव गुप्त - निर्गुण मानसपूजा - ३२/३३ श्लोक
पूर्व पक्ष (शिष्याने विचारलेले प्रश्न)
उत्तर पक्ष (ही परापूजा जशीच्या तशी आहे.)
परंतु या तपशीलात न जाता त्याचे अंतरंग जाणावे. (तत्त्व)
स्तोत्रपरंपरा: नामावली - दशनाम, द्वादशनाम, चतुर्दशनाम शतनाम, अष्टोत्तरशतनाम (१०८) सहस्रनाम
कवचात्मक - रामरक्षा, हनुमत्कवच, शिवकवच अंगप्रत्यंगाचे सर्व बाजूंनी रक्षण व्हावे.
तत्त्वज्ञानात्मक - हृदयस्तोत्र - आदित्यहृदय
दार्शनिक तत्त्वप्रधान

APRIL

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

## मानसपूजा।

कोणत्याही देव देवतांची पूजा करण्यासाठी अंतरीचा भाव महत्त्वाचा! सामग्री नाही आणि भक्तिवाचून केलेली पूजा व्यर्थच समजावी. खऱ्या आनंदाकरता पूजेच्या बाह्य उपचारापेक्षा मानसिक उपचारामुळेच देवाशी तन्मयता साधता येते. त्यासाठी कोणतीही पूजासामग्री नसताना मानसपूजा जर श्रद्धेने केली तर निश्चितच मनाला देवपूजेचे समाधान लाभेल. मात्र प्रत्येक उपचार करताना जणू काही खरोखर मी ते अर्पण करत आहे असा भाव असावा.

## परा पूजा —

मानसपूजा अंत:करणात स्थिरावली की त्याच्या पुढची पायरी आहे - परा पूजा। जी अतिशय उच्च कोटीची आहे। परा म्हणजे श्रेष्ठ आणि परा म्हणजे पलीकडचे अव्यक्त।
Higher Superior or beyond, further, | Afterwards
On the other side. Alien, Stranger |
The supreme spirit - Out of the world.

इन्द्रियाणि पराण्याहु: इन्द्रियेभ्य: परं मन:।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धे: परतस्तु स:॥

याच्या उलट अपर म्हणजे अलीकडचे, जवळचे, गोचर व्यक्त, दृश्य भौतिक — परा प्रकृति X अपरा प्रकृति.

→ पादादिशिखान्त-सौंदर्य वर्णन करणारी स्तोत्रे.
केशादिपादान्त- चित्रदर्शी- श्रुति स्मृति पुराण, आगमांची तत्त्वे यात वर्णन केले आहे. सौंदर्यलहरी —
भगवान् मानसपूजा. त्रिपुरसुंदरी- चतु:षष्ट्युपचार स्तोत्र (६४)
गणेशमानसपूजा, शिवमानसपूजा.
याचाच पुढचा टप्पा म्हणजे परा पूजा

© www.madhaveeragruveer.com

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

JUNE

# पूजा कशासाठी करायची ?

आजकालच्या वेगवान युगामध्ये 'धर्म' हा शब्द Outdated झाला आहे किंवा एकदम जळून आहे. धर्माला अनुसरून जी कार्ये करायला हवीत ती हल्ली केली जात नाहीत. 'कर्मकांड' समजून त्याचा अव्हेर केला जातो. दुर्लक्ष केले जाते. त्याकडे 'हेय' दृष्टीने पाहिले जाते.

ज्याच्यामुळे या विश्वाची, सृष्टीची, पिंड-ब्रह्मांडाची धारणा होते तो धर्म! आणि त्यासाठी - धर्मकृत्य
यज्ञ — दान — तप ——> देवतार्चन - वरिवस्या, आराधना, आपल्याला प्रिय असणारी वस्तु देवतांना अर्पण करायची) यथा देहे तथा देवे। आपल्याला सुखकर असणारी गोष्ट त्या भगवंताच्या मूर्तीला अर्पण करणे हा त्या पूजेमागील भाव असला तरी केवळ त्या उपचारात अडकून पडायचे नाही.

आपण ज्याच्यासाठी हे सर्व करतो त्याला या सर्वांची गरज आहे का? हा हेतूच्या मागे नसावा. आपल्या वृत्ती, विचार, वासना ज्यामध्ये गुंतल्या आहेत त्या गोष्टी आपल्याही नकळत अलगदपणे भगवंताला अर्पण करायच्या. माणसाला नटायला आवडते, सुगंध आवडतो. सर्वांनाच अन्नपदार्थ आवडतात. या वासना-स्थानापासून अलिप्त होता यावं यासाठी ते भगवंताला अर्पण करायचं. म्हणजे तुम्ही उपभोगण्यापूर्वी त्याला द्यायचे. फुलं, कपडे, संपत्ति, शेतीतील पीक — परंपरा सांभाळली जाते.

देवाला पुरणपोळी, लाडू नको आहे. आपण त्या पदार्थांमधून जीवाची वासना अडकू नये. निर्वासन होण्याच्या दिशेने केलेला हा प्रयत्न! प्राचीन संस्कृतीमध्ये देखील हे समर्पण होतंय. हे केलं नाही तर स्खलन निश्चित। व्यक्तिपूजेपेक्षा विभूतिपूजा महत्त्वाची आहे. वासनेतून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे पूजा — कुळधर्म, कुळाचार - उपचारांची संख्या वेगळी पंच, षोडश, द्वात्रिंश उपचार. चतुःषष्ट्युपचार

परंतु उपचार समर्पित करणे ही इतिकर्तव्यता नाही. हा बोध साधकाला होण्यासाठी ही परा पूजा आहे. उपचारांपेक्षा स्वरूपाचे ज्ञान / भान होणे गरजेचे आहे. या कर्मातील अनुशासन, क्रम हा बुद्धिच्या शुद्धी साठी आहे. मनातील विकार क्षीण होण्यासाठी हा काटेकोरपणा सांभाळायला हवा. इथे अभिनिवेश, अहंभाव नको. अशी पूजा पूर्णत्वाला पोहोचत नाही.

या ऐहिक, भौतिक, मर्त्य बंधनांच्या पलीकडे असणाऱ्या परमात्म्याची पूजा केवळ भावानेच होते. त्याची तृप्ती या बाह्य पदार्थांनी होत नाही. हाच बोध या स्तोत्रातून घ्यायचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| आवाहन | आसन | अर्घ्यपाद्य | आचमन |
| उपहार | स्नान | वस्त्र | अलंकार |
| गंध | पुष्प | धूप | दीप |
| मधुपर्क | नैवेद्य | नमस्कार | फलश्रुती |

पुरुषसूक्तातील एकेक मंत्र म्हणून आराध्यदेवतेची षोडशोपचार पूजा केली जाते. परंतु प्रत्येक उपचार करत असताना त्यातील वैयर्थ्य जाणवते. त्या परिपूर्ण परमात्म्याची पूजा अपूर्ण, तुटपुंज्या साधनांनी करणे कसे अनुचित आहे याची साक्ष वारंवार पटत जाते. आणि आपण नतमस्तक होतो.

हरी हरी वसुन्धरा पे नीला नीला ये गगन।
ये किसके बादलोंकी पालकी उडा रहा पवन।
ये किसने फूल फूल पे किया शृंगार है॥

JUNE '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| M | T | W | T | F | S | S |

© www.madhaveeraghuveer.com

श्री गुरुपौर्णिमा
२३ जुलै २०२१

॥श्री॥

## – परा पूजा –

अखण्डे सच्चिदानन्दे निर्विकल्पैकरूपिणि।
स्थितेऽद्वितीयभावेऽस्मिन् कथं पूजा विधीयते॥१॥

पूर्णस्यावाहनं कुत्र सर्वाधारस्य चासनम्।
स्वच्छस्य पाद्यमर्घ्यं च शुद्धस्याचमनं कुतः॥२॥

निर्मलस्य कुतः स्नानं वासो विश्वोदरस्य च।
अगोत्रस्य त्ववर्णस्य कुतस्तस्योपवीतकम्॥३॥

निर्लेपस्य कुतो गन्धः पुष्पं निर्वासनस्य च
निर्विशेषस्य का भूषा कोऽलङ्कारो निराकृतेः।

© www.madhaveeraghuveer.com

APRIL '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

निरञ्जनस्य किं धूपैर्दीपैर्वा सर्वसाक्षिणः।
निजानन्दैकतृप्तस्य नैवेद्यं किं भवेदिह॥५॥

विश्वानन्दयितुस्तस्य किं ताम्बूलं प्रकल्प्यते।
स्वयंप्रकाशचिद्रूपो योऽसावर्कादिभासकः।
गीयते श्रुतिभिस्तस्य नीराजनाविधिः कुतः॥६॥

प्रदक्षिणमनन्तस्य प्रणामोऽव्ययवस्तुनः।
वेदवाचामवेद्यस्य किं वा स्तोत्रं विधीयते॥७॥

अन्तर्बहिश्च पूर्णस्य कथमुद्वासनं भवेत्।
एवमेव परा पूजा सर्वावस्थासु सर्वदा।
एकबुद्ध्या तु देवेशे विधेया ब्रह्मवित्तमैः॥८॥

© www.madhaveeraghuveer.com

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |